From Gawade Saheb.

RNI No. MAHBIL/2009/35530
Reg. No. MH/MR/South-341/2011-13

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग चार

वर्ष ४, अंक ३८] मंगळवार, मार्च १३, २०१२/फाल्गुन २३, शके १९३३ [पृष्ठे १३, किंमत : रुपये १५.००

## असाधारण क्रमांक ७

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २.—** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९, नागपूर शहर (महानगर पालिका अधिनियम, १९४८ महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ आणि महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम. | १-१३ |

दिनांक २२ फेब्रुवारी २०१२ रोजी मा. राष्ट्रपतींनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

ह. बा. पटेल,
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

---

## सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २.

(मा. राष्ट्रपतींची संमती मिळाल्यानंतर " **महाराष्ट्र शासन राजपत्रात** " दिनांक १३ मार्च २०१२ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ आणि महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**



39A MMC Act 30 2013

१८८८ चा मुंबई ३. १९४९ चा मुंबई ५९. १९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड २. १९६५ चा महा. ४०. १९६६ चा महा. ३७.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ आणि महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ यांमध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या एकसष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

## प्रकरण एक

## प्रारंभिक

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र महानगरपालिका, नगरपरिषदा आणि महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) अधिनियम, २०१० असे म्हणावे.

(२) तो, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नेमून देईल अशा दिनांकास अंमलात येईल.

## प्रकरण दोन

## मुंबई महानगरपालिका अधिनियम याची सुधारणा

सन १८८८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ३ ची सुधारणा.

**२.** मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या (यात यापुढे, या प्रकरणात, ज्याचा निर्देश "मुंबई महानगरपालिका अधिनियम" असा करण्यात आला आहे), कलम ३ मध्ये, खंड (ईअ) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :— १८८८ चा मुंबई ३.

" (ईब) "पदनिर्देशित अधिकारी" म्हणजे, कलम ३५१ च्या पोट-कलम (१) अन्वये पदनिर्देशित केलेला एखादा अधिकारी ; ".

सन १८८८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ३५१ ची सुधारणा.

**३.** मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ३५१ मध्ये,—

(१) विद्यमान पोट-कलम (१) ला पोट-कलम (१अ) असा नवीन क्रमांक देण्यात येईल आणि अशा प्रकारे नवीन क्रमांक देण्यात आलेल्या पोट-कलम (१अ) पूर्वी, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

" (१) आयुक्त, या कलमाच्या आणि कलमे ३५२, ३५२अ व ३५४अ यांच्या प्रयोजनांकरिता, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, पदनिर्देशित अधिकारी म्हणून, महानगरपालिकेच्या एखाद्या अधिकाऱ्यास पदनिर्देशित करील. पदनिर्देशित अधिकाऱ्याची अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा स्थानिक क्षेत्रावर अधिकारिता असेल आणि वेगवेगळ्या स्थानिक क्षेत्रांकरिता वेगवेगळे अधिकारी पदनिर्देशित करता येतील. " ;

(२) अशा प्रकारे नवीन क्रमांक देण्यात आलेल्या पोट-कलम (१अ) मध्ये, " आयुक्त " हा मजकूर ज्या दोन ठिकाणी त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह आला असेल त्या मजकुराऐवजी त्या दोन ठिकाणी " पदनिर्देशित अधिकारी " हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात येईल;

(३) पोट-कलम (२) मध्ये, " आयुक्त " हा मजकूर ज्या ज्या ठिकाणी त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह आला असेल त्या मजकुराऐवजी त्या त्या ठिकाणी " पदनिर्देशित अधिकारी " हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात येईल.

सन १८८८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ३५२ ची सुधारणा.

४. मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ३५२ मध्ये,—

(१) पोट-कलम (१) मध्ये, " आयुक्तास " या मजकुराऐवजी, " पदनिर्देशित अधिकाऱ्यास " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(२) पोट-कलम (२) मध्ये, " आयुक्त " या मजकुराऐवजी, " पदनिर्देशित अधिकारी " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १८८८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ३५२अ ची सुधारणा.

५. मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ३५२अ मध्ये,—

(१) पोट-कलम (१) मध्ये, " आयुक्तांचे " या मजकुराऐवजी, " पदनिर्देशित अधिकाऱ्याचे " हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(२) पोट-कलम (२) मध्ये, " आयुक्ताने " या मजकुराऐवजी, " पदनिर्देशित अधिकाऱ्याने " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(३) पोट-कलम (३) मध्ये, " आयुक्ताने " हा मजकूर ज्या दोन ठिकाणी आला असेल त्या मजकुराऐवजी त्या दोन ठिकाणी " पदनिर्देशित अधिकाऱ्याने " हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(४) पोट-कलम (४) वगळण्यात येईल;

(५) समासटिपेमध्ये, " आयुक्ताला " या मजकुराऐवजी, " पदनिर्देशित अधिकाऱ्याला " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १८८८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ३५४अ ची सुधारणा.

६. मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ३५४अ मध्ये,—

(१) पोट-कलम (१) मध्ये, " आयुक्त " हा मजकूर ज्या दोन ठिकाणी त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह आला असेल त्या मजकुराऐवजी त्या दोन ठिकाणी " पदनिर्देशित अधिकारी " हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात येईल ;

(२) पोट-कलम (२) मध्ये, " आयुक्त " हा मजकूर ज्या ज्या ठिकाणी त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह आला असेल त्या मजकुराऐवजी त्या त्या ठिकाणी " पदनिर्देशित अधिकारी " हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात येईल ;

(३) पोट-कलम (३) मध्ये, " आयुक्ताला " या मजकुराऐवजी, " पदनिर्देशित अधिकाऱ्याला " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(४) पोट-कलम (४) मध्ये, " आयुक्ताने " या मजकुराऐवजी, " पदनिर्देशित अधिकाऱ्याने " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(५) समासटिपेमध्ये, " आयुक्ताचा " या मजकुराऐवजी, " पदनिर्देशित अधिकाऱ्याचा " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १८८८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ यामध्ये कलम ४७५ब व ४७५क समाविष्ट करणे.

**७.** मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ४७५अ नंतर, पुढील कलमे समाविष्ट करण्यात येतील :—

कलम ३५१ किंवा ३५४अ अन्वये कार्यवाही करण्यात कसूर केल्याबद्दल शिक्षा.

" **४७५ब.** कोणत्याही इमारतीच्या उभारणीचे काम किंवा कलम ३४२ मध्ये दिलेल्या प्रकारानुसार, असे कोणतेही बांधकाम सुरू करणे हे कलम ३४२ किंवा ३४७ यांच्या तरतुदींच्या विरुद्ध किंवा अन्यथा अवैधपणे सुरू केल्याचे किंवा अवैधपणे चालू ठेवल्याचे पदनिर्देशित अधिकाऱ्याच्या निदर्शनास आणून देण्यात आले असेल; आणि जर असा पदनिर्देशित अधिकारी, पुरेशा कारणांशिवाय, कलम ३५१ किंवा ३५४अ अन्वये तरतूद केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यात कसूर करीत असेल तर, त्यास, दोषसिद्धीनंतर, तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल किंवा वीस हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल किंवा दोन्ही शिक्षा होतील.

विवक्षित अपराध आपसात मिटवणे.

**४७५क.** (१) आयुक्तास, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, कार्यवाही सुरू करण्यापूर्वी किंवा सुरू केल्यानंतर, कलम ४७५अ खालील शिक्षायोग्य असलेला कोणताही अपराध आपसात मिटवता येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये जेव्हा एखादा अपराध आपसात मिटविण्यात आला असेल तेव्हा, आपसात मिटविण्यात आलेल्या अपराधाच्या संबंधात अपराधी व्यक्तीविरुद्ध आणखी कोणतीही कार्यवाही करण्यात येणार नाही आणि या अगोदरच कोणतीही कार्यवाही करण्यात आली असेल तर ती समाप्त, होईल आणि अपराधी अभिरक्षेत असेल तर, त्यास मुक्त करण्यात येईल.".

सन १८८८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ यामध्ये कलम ५१५अ समाविष्ट करणे.

**८.** मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ५१५ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

अधिकारितेस रोध.

" **५१५अ.** या अधिनियमात अन्यथा तरतूद करण्यात आली असेल त्याव्यतिरिक्त, कलम ३५१ किंवा ३५४अ अन्वये पदनिर्देशित अधिकाऱ्याने काढलेली कोणतीही नोटीस, काढलेला कोणताही आदेश किंवा दिलेला कोणताही निदेश, यांना कोणत्याही दाव्यामध्ये किंवा इतर कायदेशीर कार्यवाहीमध्ये हरकत घेता येणार नाही. ".

९. मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ५१६अ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :— सन १८८८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ यामध्ये कलम ५१६ब समाविष्ट करणे.

" ५१६ब. कलमे ४७५अ व ४७५ब यांखालील अपराध दखलपात्र व जमानतयोग्य असतील. ". कलमे ४७५अ व ४७५ब यांखालील अपराध दखलपात्र व जमानतयोग्य असणे.

## प्रकरण तीन

## मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ याची सुधारणा

१९४९ चा मुंबई ५९. १०. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ (यात यापुढे, या प्रकरणात, ज्याचा निर्देश " प्रांतिक महानगरपालिका अधिनियम " असा करण्यात आला आहे), याच्या कलम २ मध्ये, खंड (१६क) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :— सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९ याच्या कलम २ ची सुधारणा.

" (१६ख) " पदनिर्देशित अधिकारी " म्हणजे, कलम २६० च्या पोट-कलम (१) अन्वये पदनिर्देशित केलेला एखादा अधिकारी ; ".

११. प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाच्या कलम २६० मध्ये,— सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९ याच्या कलम २६० ची सुधारणा.

(१) विद्यमान पोट-कलम (१) ला पोट-कलम (१क) असा नवीन क्रमांक देण्यात येईल आणि असा नवीन क्रमांक देण्यात आलेल्या पोट-कलम (१क) पूर्वी पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

" (१) आयुक्त, या कलमाच्या आणि कलमे २६१, २६४, २६७ व ४७८ यांच्या प्रयोजनांकरिता राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, " पदनिर्देशित अधिकारी " म्हणून महानगरपालिकेच्या एखाद्या अधिकाऱ्यास पदनिर्देशित करील. पदनिर्देशित अधिकाऱ्याची अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा स्थानिक क्षेत्रावर अधिकारिता असेल आणि वेगवेगळ्या स्थानिक क्षेत्रांकरिता वेगवेगळे अधिकारी पदनिर्देशित करता येतील. ";

(२) अशा प्रकारे नवीन क्रमांक दिलेल्या पोट-कलम (१क) मध्ये, " आयुक्त " हा मजकूर ज्या दोन ठिकाणी त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह आला असेल त्या दोन ठिकाणी त्या मजकुराऐवजी, " पदनिर्देशित अधिकारी " हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात येईल ;

(३) पोट-कलम (२) मध्ये, " आयुक्त " हा मजकूर ज्या दोन ठिकाणी त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह आला असेल त्या दोन ठिकाणी त्या मजकुराऐवजी, " पदनिर्देशित अधिकारी " हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात येईल.

सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९ याच्या कलम २६१ ची सुधारणा.

१२. प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाच्या कलम २६१ मध्ये,—

(१) पोट-कलम (१) मध्ये, " आयुक्त " या मजकुराऐवजी, " पदनिर्देशित अधिकारी " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(२) पोट-कलम (२) मध्ये, " आयुक्ताने " या मजकुराऐवजी, " पदनिर्देशित अधिकाऱ्याने " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९ याच्या कलम २६४ ची सुधारणा.

१३. प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाच्या कलम २६४ मध्ये,—

(१) पोट-कलम (१) मध्ये, " आयुक्त " हा मजकूर ज्या ज्या ठिकाणी त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह आला असेल त्या मजकुराऐवजी त्या त्या ठिकाणी त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह " पदनिर्देशित अधिकारी " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(२) पोट-कलम (२) मध्ये, " आयुक्त " हा मजकूर ज्या दोन ठिकाणी त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह आला असेल त्या दोन ठिकाणी त्या मजकुराऐवजी " पदनिर्देशित अधिकारी " हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात येईल ;

(३) पोट-कलम (३) मध्ये, " आयुक्तास " या मजकुराऐवजी, " पदनिर्देशित अधिकाऱ्यास " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(४) पोट-कलम (४) मध्ये, " आयुक्ताला " या मजकुराऐवजी, " पदनिर्देशित अधिकाऱ्याला " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(५) पोट-कलम (५) मध्ये, " आयुक्त " हा मजकूर ज्या ज्या ठिकाणी त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह आला असेल त्या मजकुराऐवजी त्या त्या ठिकाणी त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह " पदनिर्देशित अधिकारी " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९ याच्या कलम २६७ ची सुधारणा.

१४. प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाच्या कलम २६७ मध्ये,—

(१) पोट-कलम (१) मध्ये, " आयुक्ताची " या मजकुराऐवजी, " पदनिर्देशित अधिकाऱ्याची " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(२) पोट-कलम (२) मध्ये, " आयुक्तास " या मजकुराऐवजी, " पदनिर्देशित अधिकाऱ्यास " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(३) समासटिपेमध्ये, " आयुक्ताचे " या मजकुराऐवजी, " पदनिर्देशित अधिकाऱ्याचे " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

१५. प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ३९७ नंतर, पुढील कलमे समाविष्ट करण्यात येतील :— सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९ यामध्ये कलमे ३९७क व ३९७ख समाविष्ट करणे.

"३९७क. (१) कलम २६०, २६१, २६४, २६७ किंवा ४७८ अन्वये ज्या कोणत्याही व्यक्तीविरूद्ध नोटीस बजावण्यात आली असेल त्या व्यक्तीने,— कलम २६०, २६१, २६४, २६७ किंवा ४७८ अन्वये दिलेल्या नोटिशीचे अनुपालन करण्यात कसूर केल्याबद्दल शिक्षा.

(क) इमारतीचा पाया, जोते किंवा मजला, किंवा बांधकामाचे भाग किंवा भार पेलणाऱ्या भिंती पूर्ववत करण्यासंबंधीच्या नोटिशीचे अनुपालन केले नाही व त्यायोगे, अशी इमारत किंवा तिच्या शेजारची अन्य कोणतीही इमारत किंवा जागा याचा भोगवटा करणाऱ्या, आश्रय घेणाऱ्या किंवा त्या जवळून जाणाऱ्या कोणत्याही व्यक्तीच्या जीविताला आणि मालमत्तेला धोका निर्माण केला तर, त्या व्यक्तीला तीन महिन्यांपेक्षा कमी नसेल परंतु तीन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची आणि दहा हजार रुपयांपेक्षा कमी नसेल परंतु पन्नास हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल ; आणि असे उल्लंघन करणे तसेच चालू राहिल्यास, असे पहिले उल्लंघन सिद्ध झाल्यावर, पुढील प्रत्येक दिवसास एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल ; किंवा

(ख) अनधिकृत बांधकाम हलवणे, पाडून टाकणे यासंबंधीच्या नोटिशीचे अनुपालन केले नाही तर त्या व्यक्तीला एक महिन्यापेक्षा कमी नसेल परंतु एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची आणि पाच हजार रुपयांपेक्षा कमी नसेल परंतु पंचवीस हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल ; आणि असे उल्लंघन करणे तसेच चालू राहिल्यास, असे पहिले उल्लंघन सिद्ध झाल्यावर, पुढील प्रत्येक दिवसास पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

(२) कोणत्याही इमारतीच्या उभारणीचे काम किंवा कलम २५४ मध्ये दिलेल्या प्रकारानुसार असे कोणतेही बांधकाम हे, अधिनियम, नियम किंवा उपविधी यांच्या तरतुदींविरुद्ध सुरू करण्यात आले आहे किंवा ते पार पाडण्यात येत आहे असे पदनिर्देशित अधिकाऱ्याच्या निदर्शनास आणून देण्यात आले असेल ; आणि जर असा पदनिर्देशित अधिकारी पुरेशा कारणांशिवाय कलम २६०, २६४, २६७ किंवा ४७८ अन्वये तरतूद केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यात कसूर करीत असेल तर त्याला दोषसिद्धीनंतर तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल किंवा वीस हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल किंवा दोन्ही शिक्षा होतील.

विवक्षित अपराध आपसात मिटवणे.

**३९७ख.** (१) आयुक्तास, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, कार्यवाही सुरू करण्यापूर्वी किंवा सुरू केल्यानंतर, कलम ३९७क याच्या पोट-कलम (१) खालील शिक्षायोग्य असलेला कोणताही अपराध आपसात मिटविता येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये जेव्हा एखादा अपराध आपसात मिटविण्यात आला असेल तेव्हा, आपसात मिटविण्यात आलेल्या अपराधाच्या संबंधात अपराधी व्यक्तीविरुद्ध आणखी कोणतीही कार्यवाही करण्यात येणार नाही आणि या अगोदरच कोणतीही कार्यवाही करण्यात आली असेल तर ती समाप्त होईल, आणि अपराधी अभिरक्षेत असेल तर, त्यास मुक्त करण्यात येईल. ".

सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९ याच्या कलम ४२७ ची सुधारणा.

**१६.** प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ४२७ मध्ये, विद्यमान पोट-कलम (१) ला त्याचा खंड (क) असा नवीन क्रमांक देण्यात येईल ; आणि अशा रीतीने नव्याने क्रमांक दिलेल्या खंड (क) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (ख) कलम ३९७क खालील अपराध दखलपात्र व जमानतयोग्य असतील. ".

सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९ यामध्ये कलम ४३३क समाविष्ट करणे.

**१७.** प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ४३३ नंतर, " दहा. किरकोळ " या शीर्षकानंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

अधिकारितेस रोध.

" **४३३क.** या अधिनियमात अन्यथा तरतूद करण्यात आली असेल त्याव्यतिरिक्त, कलम २६०, २६१, २६४, २६७ किंवा ४७८ अन्वये पदनिर्देशित अधिकाऱ्याने काढलेली कोणतीही नोटीस, काढलेला कोणताही आदेश किंवा दिलेला कोणताही निदेश, यांना कोणत्याही दाव्यामध्ये किंवा इतर कायदेशीर कार्यवाहीमध्ये हरकत घेता येणार नाही. ".

सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९ याच्या कलम ४७८ ची सुधारणा.

**१८.** प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ४७८ मधील पोट-कलमे (१) व (२) यांमध्ये, " आयुक्त " हा मजकूर ज्या ज्या ठिकाणी त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह आला असेल त्या त्या मजकुराऐवजी त्या ठिकाणी " पदनिर्देशित अधिकारी " हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात येईल.

## प्रकरण चार

## नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ याची सुधारणा

सन १९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ५ ची सुधारणा.

**१९.** नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ (यात यापुढे, या प्रकरणात, ज्याचा निर्देश " नागपूर महानगरपालिका अधिनियम " असा करण्यात आला आहे), याच्या कलम ५ मध्ये, खंड (१४) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :— १९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड २.

" (१४क) " पदनिर्देशित अधिकारी " म्हणजे, कलम २८१ च्या पोट-कलम (१) अन्वये पदनिर्देशित केलेला एखादा अधिकारी ;".

२०. नागपूर महानगरपालिका अधिनियमाच्या कलम २८१ मध्ये,— सन १९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २ याच्या कलम २८१ ची सुधारणा.

(१) विद्यमान पोट-कलम (१) ला पोट-कलम (१क) असा नवीन क्रमांक देण्यात येईल आणि अशा प्रकारे नवीन क्रमांक दिलेल्या पोट-कलम (१क) पूर्वी, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

"(१) आयुक्त, या कलमाच्या आणि कलम २८२, कलम २८३ चे पोट-कलम (२) आणि कलम २८६ ची पोट-कलमे (१), (२) व (३) यांच्या प्रयोजनांकरिता, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, पदनिर्देशित अधिकारी म्हणून महानगरपालिकेच्या एखाद्या अधिकाऱ्यास, पदनिर्देशित करील. पदनिर्देशित अधिकाऱ्याची अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा स्थानिक क्षेत्रावर अधिकारिता असेल आणि वेगवेगळ्या स्थानिक क्षेत्रांकरिता वेगवेगळे अधिकारी पदनिर्देशित करता येतील.";

(२) अशा प्रकारे नवीन क्रमांक देण्यात आलेल्या पोट-कलम (१क) मध्ये, "आयुक्त " या मजकुराऐवजी, "पदनिर्देशित अधिकारी" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(३) पोट-कलम (२) ऐवजी, पुढील पोट-कलमे दाखल करण्यात येतील :—

" (२) या कलमाच्या पोट-कलम (१) अन्वये किंवा कलम २८६ च्या पोट-कलम (१) अन्वये ज्या कोणत्याही व्यक्तीविरुद्ध नोटीस बजावण्यात आली असेल त्या व्यक्तीने,—

(क) इमारतीचा पाया, जोते किंवा मजला, किंवा बांधकामाचे भाग किंवा भार पेलणाऱ्या भिंती पूर्ववत करण्यासंबंधीच्या नोटिशीचे अनुपालन केले नाही व त्यायोगे, अशी इमारत किंवा तिच्या शेजारची अन्य कोणतीही इमारत किंवा जागा याचा भोगवटा करणाऱ्या, आश्रय घेणाऱ्या किंवा त्या जवळून जाणाऱ्या कोणत्याही व्यक्तीच्या जीविताला आणि मालमत्तेला धोका निर्माण केला तर, त्या व्यक्तीला तीन महिन्यांपेक्षा कमी नसेल परंतु तीन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची आणि दहा हजार रुपयांपेक्षा कमी नसेल परंतु पन्नास हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल ; आणि असे उल्लंघन करणे तसेच चालू राहिल्यास, असे पहिले उल्लंघन सिद्ध झाल्यावर, पुढील प्रत्येक दिवसास एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल ;

१९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड २.

(ख) अनधिकृत बांधकाम हलवणे, पाडून टाकणे यासंबंधीच्या नोटिशीचे अनुपालन केले नाही तर त्या व्यक्तीला एक महिन्यापेक्षा कमी नसेल परंतु एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची आणि पाच हजार रुपयांपेक्षा कमी नसेल परंतु पंचवीस हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल ; आणि असे उल्लंघन करणे तसेच चालू राहिल्यास, असे पहिले उल्लंघन सिद्ध झाल्यावर, पुढील प्रत्येक दिवसास पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

(३) कोणत्याही इमारतीच्या उभारणीचे काम किंवा कोणतेही बांधकाम हे, कलम २७३ चे उल्लंघन करून किंवा अधिनियम, नियम किंवा उपविधी यांच्या तरतुदींविरुद्ध सुरू करण्यात आले आहे किंवा ते पार पाडण्यात येत आहे असे पदनिर्देशित अधिकाऱ्याच्या निदर्शनास आणून देण्यात आले असेल ; आणि जर असा पदनिर्देशित अधिकारी पुरेशा कारणांशिवाय, कलम २८१ किंवा २८६ अन्वये तरतूद केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यात कसूर करीत असेल तर त्याला दोषसिद्धीनंतर तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल किंवा वीस हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल किंवा दोन्ही शिक्षा होतील. ".

सन १९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २ यामध्ये कलम २८१क समाविष्ट करणे.

**२१.** नागपूर महानगरपालिका अधिनियम याच्या कलम २८१ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

विवक्षित अपराध आपसात मिटवणे.

" **२८१क.** (१) आयुक्तास, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, कार्यवाही सुरू करण्यापूर्वी किंवा सुरू केल्यानंतर, कलम २८१ च्या पोट-कलम (२) खालील शिक्षायोग्य असलेला कोणताही अपराध आपसात मिटवता येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये जेव्हा एखादा अपराध आपसात मिटविण्यात आला असेल तेव्हा, आपसात मिटविण्यात आलेल्या अपराधाच्या संबंधात अपराधी व्यक्तीविरुद्ध आणखी कोणतीही कार्यवाही करण्यात येणार नाही आणि या अगोदरच कोणतीही कार्यवाही करण्यात आली असेल तर ती समाप्त होईल आणि अपराधी अभिरक्षेत असेल तर, त्यास मुक्त करण्यात येईल. ".

सन १९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २ याच्या कलम २८३ ची सुधारणा.

**२२.** नागपूर महानगरपालिका अधिनियमाच्या कलम २८३ मध्ये, पोट-कलम (२) मधील " आयुक्तास ती इमारत तिच्या मालकाच्या खर्चाने पाडून टाकता येईल " या मजकुराऐवजी, " पदनिर्देशित अधिकाऱ्यास ती इमारत तिच्या मालकाच्या खर्चाने पाडून टाकता येईल " हा मजकूर दाखल करण्यात येईल. १९६० चा महा. ४०.

सन १९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २ याच्या कलम २८६ ची सुधारणा.

**२३.** नागपूर महानगरपालिका अधिनियमाच्या कलम २८६ मध्ये,—

(१) पोट-कलम (१) मध्ये, " आयुक्ताला " या मजकुराऐवजी, "पदनिर्देशित अधिकाऱ्याला" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(२) पोट-कलम (२) मध्ये, " आयुक्त " हा मजकूर ज्या ज्या ठिकाणी त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह आला असेल त्या त्या ठिकाणी त्या मजकुराऐवजी " पदनिर्देशित अधिकारी " हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात येईल ;

(३) पोट-कलम (३) मध्ये, "आयुक्त" हा मजकूर ज्या ज्या ठिकाणी त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह आला असेल त्या त्या ठिकाणी त्या मजकुराऐवजी "पदनिर्देशित अधिकारी" हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात येईल ;

(४) पोट-कलम (४) मध्ये, "नाही तर आयुक्तास" या मजकुराऐवजी "नाही तर पदनिर्देशित अधिकाऱ्यास" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

२४. नागपूर महानगरपालिका अधिनियमाच्या कलम २८७ मध्ये "किंवा आयुक्ताने" या मजकुराऐवजी "आयुक्ताने किंवा पदनिर्देशित अधिकाऱ्याने" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २ याच्या कलम २८७ ची सुधारणा.

२५. नागपूर महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ४२६ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

सन १९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २ यात कलम ४२६क समाविष्ट करणे.

"४२६क. कलम २८१ खालील अपराध हे दखलपात्र व जमानतयोग्य असतील.".

कलम २८१ खालील अपराध दखलपात्र व जमानतयोग्य असणे.

## प्रकरण पाच

### महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ याची सुधारणा

१९६५ चा महा. ४०. २६. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (यात यापुढे, या प्रकरणात, ज्याचा निर्देश "नगरपरिषदा अधिनियम" असा करण्यात आला आहे), याच्या कलम १८९ मध्ये,—

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम १८९ ची सुधारणा.

(१) पोट-कलम (९) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

"(९) या कलमाच्या पोट-कलम (८) अन्वये किंवा कलम १९५ च्या पोट-कलम (२) अन्वये ज्या कोणत्याही व्यक्तीविरुद्ध नोटीस बजावण्यात आली असेल त्या व्यक्तीने,—

(क) इमारतीचा पाया, जोते किंवा मजला, किंवा बांधकामाचे भाग किंवा भार पेलणाऱ्या भिंती पूर्ववत करण्यासंबंधीच्या नोटिशीचे अनुपालन केले नाही व त्यायोगे, अशी इमारत किंवा तिच्या शेजारची अन्य कोणतीही इमारत किंवा

जागा याचा भोगवटा करणाऱ्या, आश्रय घेणाऱ्या किंवा त्या जवळून जाणाऱ्या कोणत्याही व्यक्तीच्या जीविताला आणि मालमत्तेला धोका निर्माण केला तर, त्या व्यक्तीला तीन महिन्यांपेक्षा कमी नसेल परंतु तीन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची आणि दहा हजार रुपयांपेक्षा कमी नसेल परंतु पन्नास हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल ; आणि असे उल्लंघन करणे तसेच चालू राहिल्यास, असे पहिले उल्लंघन सिद्ध झाल्यावर, पुढील प्रत्येक दिवसास एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल ; किंवा

(ख) अनधिकृत बांधकाम हलवणे, ते पाडून टाकणे यासंबंधीच्या नोटिशीचे अनुपालन केले नाही तर त्या व्यक्तीला एक महिन्यापेक्षा कमी नसेल परंतु एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची आणि पाच हजार रुपयांपेक्षा कमी नसेल परंतु पंचवीस हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल ; आणि असे उल्लंघन करणे तसेच चालू राहिल्यास, असे पहिले उल्लंघन सिद्ध झाल्यावर, पुढील प्रत्येक दिवसास पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल." ;

(२) पोट-कलम (१२) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल :—

"(१३) कोणत्याही इमारतीच्या उभारणीचे काम किंवा कोणतेही बांधकाम हे, हा अधिनियम, नियम किंवा उपविधी यांच्या तरतुदींविरुद्ध सुरू करण्यात आले आहे किंवा ते पार पाडण्यात येत आहे असे मुख्य अधिकाऱ्याच्या किंवा विहित रीतीने परिषदेकडून नामनिर्देशित केलेल्या परिषदेच्या इतर कोणत्याही अधिकाऱ्याच्या निदर्शनास आणून देण्यात आले असेल ; आणि जर असा अधिकारी, पुरेशा कारणांशिवाय, या कलमान्वये तरतूद केल्याप्रमाणे, कार्यवाही करण्यात कसूर करीत असेल तर, त्याला दोषसिद्धीनंतर, तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल किंवा वीस हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल किंवा दोन्ही शिक्षा होतील.".

*सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० यामध्ये कलम ३००क समाविष्ट करणे.*

२७. नगरपरिषदा अधिनियमाच्या कलम ३०० नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

*कलम १८९ खालील अपराध दखलपात्र व जमानतयोग्य असणे.*

"३००क. कलम १८९ च्या पोट-कलम (९) व पोट-कलम (१३) खालील अपराध हे दखलपात्र व जमानतयोग्य असतील.".

*सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० यामध्ये कलम ३०१क समाविष्ट करणे.*

२८. नगरपरिषदा अधिनियमाच्या कलम ३०१ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

"३०१क. या अधिनियमात, अन्यथा तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त, मुख्य अधिकाऱ्याने, कलम १८९ च्या पोट-कलम (८) अन्वये किंवा, यथास्थिति, कलम १८९ च्या पोट-कलम (१३) अन्वये नामनिर्देशित केलेल्या अधिकाऱ्याने काढलेली कोणतीही नोटीस, काढलेला कोणताही आदेश किंवा देण्यात आलेला कोणताही निदेश यांना कोणत्याही दाव्यामध्ये किंवा अन्य कायदेशीर कार्यवाहीमध्ये हरकत घेता येणार नाही.". अधिकारीतेस रोध.

## प्रकरण सहा

## महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ याची सुधारणा

१९६६ चा महा. ३७. **२९.** महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (यात यापुढे, या प्रकरणात, ज्याचा निर्देश "नगररचना अधिनियम" असा करण्यात आला आहे), याच्या कलम २ मधील खंड (६) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :— सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७ याच्या कलम २ ची सुधारणा.

"(६क) "पदनिर्देशित अधिकारी" याचा अर्थ, कलम ५३ च्या पोट-कलम (८) अन्वये पदनिर्देशित केलेला एखादा अधिकारी, असा आहे ;".

**३०.** नगररचना अधिनियमाच्या कलम ५३ मध्ये, पोट-कलम (७) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल :— सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७ याच्या कलम ५३ ची सुधारणा.

"(८) नियोजन प्राधिकरण, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, या कलमान्वये आणि कलमे ५४, ५५ व ५६ अन्वये, नियोजन प्राधिकरणाच्या अधिकारांचा वापर करण्याच्या प्रयोजनांसाठी पदनिर्देशित अधिकारी म्हणून, नियोजन प्राधिकरणाच्या एखाद्या अधिकाऱ्यास पदनिर्देशित करील. पदनिर्देशित अधिकाऱ्यास, अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अशा स्थानिक क्षेत्रावर अधिकारिता असेल आणि वेगवेगळ्या स्थानिक क्षेत्रांसाठी वेगवेगळे पदनिर्देशित अधिकारी पदनिर्देशित करता येतील.".

**३१.** नगररचना अधिनियमाच्या कलम ५६ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :— सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७ यामध्ये कलम ५६क समाविष्ट करणे.

"**५६क.** कोणत्याही इमारतीच्या उभारणीचे काम किंवा कोणतेही बांधकाम हे या अधिनियमाच्या, नियमांच्या किंवा उपविधींच्या तरतुदींचा भंग करीत असल्याचे पदनिर्देशित अधिकाऱ्याच्या निदर्शनास आणून देण्यात आले असेल आणि जर असा पदनिर्देशित अधिकारी, पुरेशा कारणांशिवाय, कलमे ५३, ५४, ५५ किंवा ५६ अन्वये तरतूद केल्याप्रमाणे, कार्यवाही करण्यात कसूर करीत असेल तर, त्यास, दोषसिद्धीनंतर, तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल किंवा वीस हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल किंवा दोन्ही शिक्षा होतील.". अनधिकृत बांधकामाविरुद्ध कार्यवाही करण्यात कसूर केल्याबद्दल शिक्षा.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.